RNI No. MAHBIL/2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक १४(२) ] बुधवार, जून ८, २०११/ज्येष्ठ १८, शके १९३३ [ पृष्ठे ३, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ४७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६.— मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश . . . . . . . . . | पृष्ठे १—३ |

विधी व न्याय विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ जून २०११.

## MAHARASHTRA ORDINANCE No. XVI OF 2011.

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE BOMBAY COURT FEES ACT, 1959.

**सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६.**

**मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९५९ चा मुंबई ३६. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, मुंबई न्यायालय-फी (सुधारणा) अध्यादेश, २०११ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६ याच्या कलम १५ ची सुधारणा.

२. मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ (यात, यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम १५ मध्ये, " जिल्हाधिका-याकडून " या मजकुराऐवजी, " जिल्हाधिका-याकडून किंवा नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने ई-प्रदानाच्या मार्गाने " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५९ चा मुंबई ३६.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६ याच्या कलम १६ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मध्ये, " जिल्हाधिका-याकडून " या मजकुराऐवजी " जिल्हाधिका-याकडून किंवा नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने ई-प्रदानाच्या मार्गाने " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६ याच्या कलम १७ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १७ मध्ये, " जिल्हाधिका-याकडून " या मजकुराऐवजी " जिल्हाधिका-याकडून किंवा नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने ई-प्रदानाच्या मार्गाने " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६ याच्या कलम ३७ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ३७ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

मुद्रांकाच्या स्वरूपात किंवा ई-प्रदानाद्वारे फी गोळा करणे.

" **३७.** कलम ३ मध्ये उल्लेख केलेली किंवा या अधिनियमान्वये आकारावयाची सर्व फी ही, मुद्रांकाच्या स्वरूपात किंवा ई-प्रदानाद्वारे गोळा करण्यात येईल. ".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ मध्ये,—

(१) खंड (क) मधील " आणि " हा शब्द वगळण्यात येईल ;

(२) खंड (ड) नंतर पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

" (ई) ई-प्रदानाद्वारे न्यायालय-फी प्रदान करण्याची व तीचा परतावा करण्याची रीत : ".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६ याच्या कलम ४२ ची सुधारणा.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ४२ मध्ये , पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, न्यायालय-फी ई-प्रदानाद्वारे देण्यात आली असेल त्याबाबतीत, मुद्रांक रद्द करण्यास सक्षम असणारा अधिकारी हा, त्या प्रदानाच्या खरेपणाबाबत पडताळणी करील आणि न्यायालय-फी देण्यात आल्याबाबत त्याची स्वत:ची खात्री पटल्यानंतर, तो संगणकावरील त्याविषयीची नोंद सुरक्षित बंद करील आणि त्या दस्तऐवजावर न्यायालय-फी देण्यात आली आहे व त्याबाबतची नोंद सुरक्षित बंद केली आहे, असे आपल्या सहीनिशी पृष्ठांकन करील. ".

# निवेदन

मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ (१९५९ चा मुंबई ३६) याच्या विद्यमान तरतुदींन्वये, आकारण्याजोगी सर्व फी, उमटविलेल्या व चिकटविलेल्या मुद्रांकांच्या मार्गाने गोळा केली जाते. न्यायालयीन कज्जांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्यामुळे, न्यायालय-फी मुद्रांकांच्या मागणीत वाढ झाली आहे. काही वेळा पक्षकारांची गरज भागविणे व त्यांच्या मागणीनुसार आवश्यक त्या न्यायालय-फी मुद्रांकाचा पुरवठा करणे कठीण होऊन बसते. सध्याच्या पद्धतीनुसार, न्यायालय फी प्रत्यक्ष मुद्रांक कागदांद्वारे प्रदान केली जाते. तथापि, या मुद्रांक कागदांच्या सत्यतेची तपासणी करणारी कोणतीही यंत्रणा कार्यान्वित नाही. अलीकडच्या काळामध्ये, काही लोक बनावट मुद्रांक बनविण्याच्या व ते वितरित करण्याच्या पद्धतशीर कारस्थानात गुंतले असल्याचे व परिणामी महसुलाची मोठी हानी झाल्याचे उघडकीस आले आहे. या समस्यांवर मात करणारी पद्धत शोधून काढणे इष्ट आहे असे शासनास वाटते. मुद्रांकाद्वारे, न्यायालय-फी चे प्रदान करण्याच्या प्रचलित पद्धतीबरोबरच, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून ई-प्रदानाद्वारे किंवा सिक्युअर्ड बँक व कोषागार पावती (एस.बी.टी.आर.) याद्वारे न्यायालय-फी प्रदान करण्यासाठी तरतूद करणारी पद्धत सुरू केल्यास या समस्या दूर करता येऊ शकतील.

२. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई, **के. शंकरनारायणन्,**

दिनांक ८ जून २०११. महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**विजय आचलिया,**

शासनाचे प्रधान सचिव व विधी परामर्शी.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI

RNI No. MAHENG/2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग आठ

वर्ष ३, अंक २०(२)] बुधवार, जून ८, २०११/ज्येष्ठ १८, शके १९३३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १४.००

असाधारण क्रमांक ६६

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Court-fees (Amendment) Ordinance, 2011 (Mah. Ord. XVI of 2011), is hereby published under the authority of the Governor

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[ Translation in English of the Bombay Court-fees (Amendment) Ordinance, 2011 (Mah. Ord. XVI of 2011) published under the authority of the Governor ].

---

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 8th June 2011.

## MAHARASHTRA ORDINANCE No. XVI OF 2011.

*AN ORDINANCE*

*further to amend the Bombay Court-fees Act, 1959.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Court-fees Act, 1959, for the purposes hereinafter appearing ;

Bom. XXXVI of 1959.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause *(1)* of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

1. *(1)* This Ordinance may be called the Bombay Court-fees (Amendment) Ordinance, 2011.

*(2)* It shall come into force at once.

Amendment of section 15 of Bom. XXXVI of 1959.

**2.** In section 15 of the Bombay Court-fees Act, 1959 (hereinafter referred to as " the principal Act "), for the words "from the Collector" the words "from the Collector or by way of e-payment, in the manner as prescribed by rules" shall be substituted.

Amendment of section 16 of Bom. XXXVI of 1959.

**3.** In section 16 of the principal Act, for the words " from the Collector" the words "from the Collector or by way of e-payment, in the manner as prescribed by rules " shall be substituted.

Amendment of section 17 of Bom. XXXVI of 1959.

**4.** In section 17 of the principal Act, for the words " from the Collector " the words " from the Collector or by way of e-payment, in the manner as prescribed by rules " shall be substituted.

Substitution of section 37 of Bom. XXXVI of 1959.

**5.** For section 37 of the principal Act, the following section shall be substituted, namely :—

Collection of fees by stamps or e-payment.

" **37**. All fees referred to in section 3 or chargeable under this Act shall be collected by stamps or e-payment. ".

Amendment of section 39 of Bom. XXXVI of 1959.

**6.** In section 39 of the principal Act,—

(*1*) in clause (*c*), the word "and" shall be deleted ;

(*2*) after clause *(d)*, the following clause shall be added, namely :—

"*(e)* the manner of payment of Court-fee and refund thereof by e-payment;".

Amendment of section 42 of Bom. XXXVI of 1959.

**7.** To section 42 of the principal Act, the following proviso shall be added, namely :—

"Provided that, where court-fee is paid by e-payment, the officer competent to cancel stamp shall verify the genuineness of the payment and after satisfying himself that the court-fee is paid, shall lock the entry in the computer and make an endorsement under his signature on the document that the court-fee is paid and the entry is locked.".

## STATEMENT.

Under the existing provisions of the Bombay Court-fees Act, 1959 (Bom. XXXVI of 1959), all fees chargeable are collected by way of impressed and adhesive stamps. Due to spurt in litigations, there is increase in demand of court-fee stamps. Sometimes it is difficult to cater the need of litigants and supply requisite court-fee stamps as per their demand. In the present system, court-fee is paid by physical court-fee stamp papers. However, there is no mechanism involved to check genuineness of these court-fee stamp papers. In the recent past, it is revealed that some people are indulging into systematic racket of preparing and circulating fake stamp papers resulting into huge loss of revenue. The Government considers it expedient to devise a system to overcome these problems. These problems can be resolved by use of advanced technology, such as introduction of a system providing for payment through e-payment or payment through Secured Bank and Treasury Receipt (SBTR) in addition to the prevailing system of payment of court-fees through court-fee stamps.

2. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Court-fees Act, 1959, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 8th June 2011.

K. SANKARANARAYANAN,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIJAY ACHLIYA,
Principal Secretary and
Remembrancer of Legal Affairs to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.